हिंगोली.

दिनांक :— १५.०१.२०२०

**प्रेसनोट**

**लोकसेवक नितीन सुभाषराव भवर, सेवक, ग्रामपंचायत हट्टा, पंचायत समिती वसमत, रा. हट्टा, ता. वसमत, जि. हिंगोली यांनी १,५००/—रू. ची लाच स्विकारल्यावरून त्यांना ताब्यात घेतले बाबत..**

---

पिडीत तक्रारदार यांनी दिनांक १०.०१.२०२० रोजी अँन्टी करप्शन ब्युरो हिंगोली येथे तक्रार दिली होती की, त्यांना स्वच्छ भारत मिशन योजनेचे शौचालय अनुदानाचे १२,०००/—रू. त्यांचे ओळखीने पंचायत समिती वसमत येथून मंजूर करून दिल्याचा व अनुदानाचा चेक बँकेत जमा करून अनुदान मिळवून दिल्याचा मोबदला/बक्षिस म्हणून श्री नितीन भवर, सेवक, ग्रामपंचायत हट्टा हे १,५००/—रू. ची लाचेची मागणी करीत असल्याबाबत तक्रार दिली होती.

त्यावरून दिनांक १०.०१.२०२० रोजी करण्यात आलेल्या पडताळणी दरम्यान लोकसेवक नितीन भवर, सेवक, ग्रामपंचायत हट्टा यांनी तक्रारदार यांचेकडून लाचेची रक्कम १,५००/— रू. स्विकारण्यास सहमती देवून ती लाचेची रक्कम दिनांक १५.०१.२०२० रोजी करण्यात आलेल्या सापळा कार्यवाही दरम्यान हट्टा येथे स्विकारली. त्यावरून लोकसेवक नितीन भवर, सेवक, ग्रामपंचायत हट्टा यांना लाचेच्या रकमेसह ताब्यात घेण्यात आले असून पुढिल कार्यवाही सुरू आहे. ही कामगिरी मा. श्रीमती कल्पना बारवकर, पोलीस अधीक्षिका, अँन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मा. श्रीमती अर्चना पाटील, अपर पोलीस अधिक्षिका, अँन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, व श्री हनुमंत गायकवाड, पोलीस उप अधिक्षक, अँन्टी करप्शन ब्युरो हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांनी पोलीस निरीक्षक ममता अफुने, पोहेकॉ श्री अभिमन्यु कांदे, पोहेकॉ श्री विजय कुमार उपरे, पोहेकॉ श्री सुभाष आढाव, पोना श्री संतोष दुमाने, पोना महारूद्रा कबाडे, पोना श्री ज्ञानेश्वर पचलिंगे, पोना श्री विनोद देशमुख, पोना श्री तानाजी मुंढे, पोशि श्री अविनाश किर्तनकार, पोशि श्री प्रमोद थोरात, अं.क.ब्युरो कार्यालय हिंगोली यांचे मदतीने केलेली आहे.

अँन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली तर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकीय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील, तर कृपया अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालयाशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अँन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहिजे असल्यास खालील मोबाईल व दुरध्वनीवर संपर्क साधावा. तसेच तक्रारदार यांना तक्रार देण्यासाठी अँन्टी करप्शन ब्युरो मार्फत मोबाईल ॲप www.acbmaharashtra.net हे सुरू करण्यात आले आहे.

**टोल फ्री क्र.—१०६४, दुरध्वनी क्र.०२४५६—२२३०५५.**

**मोबाईल क्रमांक :— ८८८७१७९९९, ९९२३०८२५६५ व ८३९०७६१५०३.**

(नितीन देशमुख)

पोलीस निरीक्षक

ला.प्र.वि. हिंगोली

Scanned by CamScanner